Balaji AMINES LIMITED

# बालाजी अमाईन्स लिमिटेड

**CIN No : L24132MH1988PLC049387**
**नोंदणीकृत कार्यालय :** बालाजी टॉवर्स, क्र. ९/१ए/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३२२४
**दूरध्वनी :** ००९१-२१७-२३१०८२४/२४५१५००,
**फॅक्स:** ००९१-२१७-२४५१५२१.
**ई-मेल:** cs@balajiamines.com **संकेतस्थळ:** www.balajiamines.com

## व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून आयोजित करावयाच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा, रेकॉर्ड डेट आणि अंतिम लाभांशाची माहिती

जाहीर सूचना देण्यात येते की, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या (यापुढे 'एमसीए' असा उल्लेख) जनरल परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ आणि भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) चे परिपत्रक SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/२०२४/१३३ दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४, (यापुढे 'परिपत्रके' असा उल्लेख) च्या तरतुदींचे पालन करून, बालाजी अमाईन्स लिमिटेड (कंपनी) ची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल (OAVM) माध्यमद्वारे शुक्रवार, १० जुलै, २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता (भा.प्र.वे.) वार्षिक सभेच्या नोटीसमध्ये नमूद विषयावर व्यवहार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. उपरोक्त एमसीए आणि सेबी परिपत्रकांच्या आवश्यकतांचे पालन करून, कंपनी आपली ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा VC किंवा OAVM द्वारे सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सामायिक ठिकाणी आयोजित करीत आहे.

संबंधित परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार कंपनीस वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल छपाई न करणे व त्याऐवजी सॉफ्ट कॉपी पाठविण्याची मुभा दिली आहे. त्यानुसार, ज्यांचे ई-मेल आयडी शुक्रवार, ५ जून, २०२६ रोजी कंपनी/ रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट/डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे नोंदणीकृत आहेत केवळ अशा भागधारकांना ३८ वी एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल २०२५-२०२६ ची सॉफ्ट कॉपी पाठवली जाईल. कंपनीचे जे भागधारक ज्यांचे ईमेल आयडी कंपनी/ रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट/डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे अपडेट केलेले नाहीत ते cs@balajiamines.com येथे कंपनीला विनंती करून ३८ व्या एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल २०२५-२०२६ ची सॉफ्ट कॉपी मिळवू शकतात. वैकल्पिकरीत्या, ३८ व्या एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल २०२५-२०२६ कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच **www.balajiamines.com, NSDL, BSE** लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध करून दिली जाईल.

ज्या भागधारकांनी त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत केलेला नाही त्यांना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे त्यांचे मतदान करण्याची संधी असेल. डीमटेरिअलाइज्ड आणि फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण केलेल्या भागधारकांसाठी दूरस्थपणे मतदान करण्याची पद्धत भागधारकांना नोटीसमध्ये प्रदान केली जाईल.

ज्या भागधारकांना त्यांचा ईमेल आयडी /बँक खाते आदेश नोंदणी करायची आहे त्यांनी खालील सूचनांचे पालन करावे.

| | |
|---|---|
| **डीमटेरियलाइज्ड धारणा** | **तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटने सुचविलेल्या प्रक्रियेनुसार, तुमच्या डिमॅट अकाऊंटमध्ये तपशील नोंदवा/ अपडेट करा.** |
| **फिजिकल धारणा** | कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटकडे **info@vccipl.com** वर विहित फॉर्म **ISR-1** आणि इतर संबंधित फॉर्ममधील तपशीलांची नोंदणी/अपडेट करा.<br>भागधारक कंपनीच्या वेबसाइट **www.balajiamines.com/investor-relations.php** वर इन्वेस्टरस कम्युनिकेशन विभागावरून विहित फॉर्म डाउनलोड करू शकतात.<br>भागधारक कंपनीच्या वेबसाइट **https://balajiamines.com/pdfn/1780830259FAQ'sissuedbySEBIwithrespecttoInvestorServiceRequestsprocessedbyRTA.pdf** वर वारंवार विचारले जाणारे प्रश्न (**"FAQs"**) देखील पाहू शकतात. |

१३ मे, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संचालक मंडळाच्या बैठकीत कंपनीच्या संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे, याची भागधारकांनी नोंद घ्यावी. एजीएम आणि लाभांशाच्या उद्देशाने रेकॉर्ड डेट ३ जुलै, २०२६ निश्चित केली आहे. आगामी एजीएममध्ये भागधारकांनी मंजूर केल्यानंतर अंतिम लाभांश एजीएमच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत दिला जाईल.

वित्त कायदा, २०२० नुसार, १ एप्रिल, २०२० पासून लाभांश उत्पन्न भागधारकांच्या हातात करपात्र असेल आणि कंपनीने विहित दराने भागधारकांना दिलेल्या लाभांशासाठी स्रोतावर कर कापून घेणे आवश्यक आहे, विविध श्रेणींसाठी विहित दरांसाठी, भागधारकांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी वित्त कायदा, २०२० आणि त्यातील सुधारणांचा संदर्भ घ्यावा. भागधारकांना विनंती केली जाते की, त्यांनी त्यांचा पॅन कंपनीकडे / आरटीए (फिजिकल मोडमध्ये असलेल्या शेअर्सच्या बाबतीत) आणि डिमॅट मोडमध्ये ठेवलेल्या शेअर्सच्या बाबतीत डिपॉझिटरीजमध्ये अपडेट करावा.

सेबीच्या दिनांक ३ नोव्हेंबर २०२१, १४ डिसेंबर २०२३, १६ मार्च २०२३ आणि १७ नोव्हेंबर २०२३ च्या सुधारित परिपत्रकानुसार, फिजिकल सिक्युरिटीज धारण करणाऱ्या भागधारकांनी कृपया ध्यानात ठेवावे की, जर फोलिओ(स्) मध्ये पॅन, संपर्क तपशील, मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील आणि नमुना स्वाक्षरी अपडेट केलेले नसतील, तर अशा फोलिओ(स्)च्या संबंधातील कोणतेही पेमेंट, लाभांश, व्याज किंवा विमोचनासह कोणतेही प्रदान कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटना संपूर्णपणे वरील सर्व तपशील सादर केल्यावर १ एप्रिल, २०२४ पासून केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून होईल.

**बालाजी अमाईन्स लिमिटेड करिता**
सही/-
**अभिजीत कोठाडिया**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाण**- सोलापूर
**दिनांक**- ८ जून २०२६